# परंपरागत 'सोने लुटीत' ग्राहकांचा कल दागिन्यांपेक्षा सुवर्ण नाण्यांकडे !

**मुंबई, १७ ऑक्टोबर/ व्यापार प्रतिनिधी**

सोन्याचा भाव सार्वकालिक उच्चांकाच्या खाली असल्याने आज दसऱ्याच्या मुहूर्तावर मुंबईच्या सराफ बाजारात सोने खरेदीच्या उत्साहात बहर दिसून आला. प्रत्यक्षात दागदागिन्यांऐवजी सोन्याच्या चिपा व नाणी खरेदीकडे कल वाढला आहे. आजच्या दिवसात मुंबईतील नाणे रूपातील सोन्याची खरेदी ३० किलोच्या घरात झाली, असा प्राथमिक अंदाज त्यांनी व्यक्त केला.

गेल्या वर्षाच्या तुलनेत ती जवळपास ३० टक्क्यांनी अधिक होती, असेही त्यांनी स्पष्ट केले. कमॉडिटी बाजार तसेच शेअर बाजारातील सोन्यातील व्यवहार मात्र सुट्टीचा दिवस असल्याने आज बंद होते. ■

आभूषणांच्या खरेदीपेक्षा आज ग्राहकांचा कल हा सुवर्ण नाणी खरेदीकडे वळल्याचे प्रमुख जवाहिरांचा कानोसा घेतला असता आढळून आले.

काही दिवसांपूर्वी २१ हजारापल्याड गेलेला स्टँडर्ड सोन्याचा भाव १० ग्रॅममागे आज रु. १९,८६० असा २० हजाराच्या पातळीखालीच होता; तर २४ कॅरट शुद्ध सोन्याचा भाव २०,०५० वर स्थिरावला होता. या बाबीमुळे आज परंपरागतरित्या सोनेखरेदी केल्या जाणाऱ्या दिवशी ग्राहकांमध्ये खरेदीसाठी उत्साह दिसून आला. गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा चांगली खरेदी झाली, असे झवेरी बाजारस्थित चांदी-सोन्याच्या रिटेलिंगमध्ये कार्यरत 'रिद्धी-सिद्धी बुलियन लि.' या कंपनीचे संचालक मुकेश कोठारी यांनी सांगितले.

रिद्धी-सिद्धी बुलियनकडून सोने खरेदीचे ऑनलाइन स्पॉट मार्केट चालविले जाते. जे आज दसरा सणानिमित्त रविवारच्या दिवशीही कार्यरत होते. कंपनीशी संलग्नता असलेले मुंबई आणि परिसरातील तब्बल २००० जवाहिर आहेत. मुकेश कोठारी यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, परंपरागत प्रथेनुरूप सोने-खरेदी सुरू आहे, मात्र



विजयादशमीला 'सोने लुटण्या'ची परंपरा केवळ प्रतीकात्मकच नाही तर या दिवशी सोने खरेदीच्या उत्साहाला जणू उधाण आलेले असते. सोन्याचा भाव २० हजाराची वेस ओलांडून पुढे जात असला तरी सोने खरेदीचा उत्साह जराही उणावलेला नाही. छाया– प्रदीप कोचरेकर

## आता सोने खरेदी 'एटीएम'वर!

**नवी दिल्ली, १७ ऑक्टोबर/ पीटीआय**

जगातील सर्वात मोठा सोन्याचा उपभोक्ता देश असलेल्या भारतात आता सोने 'एटीएम' मशीनद्वारे मिळविणे शक्य होईल. जर्मनीच्या एक्स ओरिएण्टे लक्स एजी या कंपनीने हे चलनी नोटांप्रमाणे स्वयंचलितरीत्या सोने वितरीत करणारे गोल्ड व्हेंडिंग मशीन विकसित केले असून, ते भारतात कार्यान्वित करण्यासाठी भागीदारांबाबत बोलणी सुरू केली आहेत. या कंपनीकडून सुवर्ण धातूच्या विक्रीचे ऑनलाइन दालनही चालविले जाते. 'गोल्ड टू गो' या नावाचे हे एटीएम मशीन जर्मनी, इटली, स्पेन व्यतिरिक्त अलीकडेच अबूधाबीमध्ये कार्यान्वित झाले आहे. दर दहा मिनिटाला या मशीनवर आपोआप सोन्याची किंमत कंपनीच्या वेबसाइटप्रमाणे अद्ययावत केली जाते. ■

